महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९० वे | दिनांक : १६/१०/२०२६ | वार : शुक्रवार

# आतापर्यंत कोणत्याही सरकारने शेतकऱ्यांना अग्रिम मदत दिली नाही



**अमरावती** : "राज्यातील शेतकरी आज गंभीर दुष्काळात होरपळत आहे. खरीप पिके पूर्णपणे गेली असून रब्बीची पेरणीही धोक्यात आली आहे. अशा अत्यंत बिकट परिस्थितीत 'देवाभाऊ' म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात आतापर्यंत कोणत्याही सरकारने दिवाळीपूर्वी थेट बँक खात्यात अशी 5 हजार रुपयांची 'अग्रीम' (आगाऊ) मदत दिली नव्हती. काँग्रेस नेत्यांना या रकमेची किंमत नसेल, पण आत्महत्या करण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याचा सण गोड करण्यासाठी हा अग्रिम मोठा आधार ठरणार आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत निराश होऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, संपूर्ण सरकार तुमच्या सोबत आहे," असा विश्वास भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी व्यक्त केला. अमरावती येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना खासदार बोंडे यांनी दुष्काळी उपाययोजना, अमरावती शिक्षक मतदारसंघातील 'प्रसाद-पैठणी' वाद, बंडखोरी, स्वतःच्या भगिनी संगीता शिंदे यांची उमेदवारी आणि अमेरिकन नागरिकत्व असलेल्या अभिनेत्याच्या आंदोलनातील सहभागावर रोखठोक विधाने केली. अमरावती जिल्ह्यात गेल्या 40 दिवसांत 36 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या विदारक आकडेवारीवर चिंता व्यक्त करताना ते म्हणाले, "दुष्काळाची अंतिम मदत मिळण्यास शासकीय प्रक्रियेमुळे वेळ लागतो. मात्र, दिवाळी तोंडावर असल्याने राज्यातील सुमारे 1 कोटी 40 लाख खातेदार शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी 5 हजार रुपयांची थेट अग्रिम मदत जमा करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. यावर यशोमती ठाकूर 'भीक' म्हणून टीका करतात; मात्र त्यांच्या सरकारच्या काळात दुष्काळ, गारपीट किंवा अतिवृष्टीचा साधा एक रुपयाही मिळाला नव्हता. ही अंतिम मदत नसून केवळ सणासाठी दिलेला तात्काळ हातभार आहे.“ "महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीचे (DPDC) इतर सर्व खर्च बाजूला ठेवून संपूर्ण निधी दुष्काळ निवारण, रोजगार हमीची कामे, विहिरींचे खोलीकरण आणि अखंड वीजपुरवठ्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्यावर खर्च करण्याचे सक्त आदेश दिले आहेत. विद्यार्थ्यांची फी आणि परीक्षा शुल्क माफ झाले असून कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे. नैराश्य आल्यास पक्षाचा बूथ प्रमुख, पदाधिकारी, आमदार, खासदार किंवा थेट माझ्याशी संपर्क साधा. कोणत्याही अडचणीत शासन आणि देवाभाऊ मदतीसाठी 24 तास तत्पर आहेत."

# सुट्टे मसाले विक्रीवर बंदी; ‘१००% प्युअर’चा दावा केल्यासही कारवाई

**मुंबई** : मसाल्यांमधील भेसळ, दूषितीकरण आणि ग्राहकांची दिशाभूल रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कठोर भूमिका घेतली आहे. मसाला पावडर आणि मिश्र मसाल्यांची सुट्या स्वरूपात, विनापॅकिंग विक्री करण्यास प्रतिबंध असून, मसाल्यांचे उत्पादन, साठवणूक, पॅकिंग आणि विक्री करताना अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. तसेच, ‘१००% प्युअर’, ‘१००% नॅचरल’ किंवा ‘ऑरगॅनिक’ असे दावे केल्यास त्यासाठी वैज्ञानिक पुरावे सादर करावे लागतील. पुरावे नसलेले किंवा ग्राहकांची दिशाभूल करणारे दावे आढळल्यास संबंधित उत्पादकांवर कारवाई केली जाईल, असा इशारा महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. मसाल्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने विविध नियम लागू केले असून, त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. आगामी काळात या नियमांची व्यापक स्तरावर तपासणी केली जाणार आहे. यासाठी ‘मिशन मोड’मध्ये कारवाई करण्यात येणार असल्याचे मुंढे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. मसाला पावडर आणि मिश्र मसाल्यांची सुट्या स्वरूपात, विनापॅकिंग विक्री करण्यास प्रतिबंध असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. अशा विक्रीमुळे मसाल्यांमध्ये भेसळ होण्याची तसेच ते दूषित होण्याची शक्यता वाढते. याशिवाय, मसाल्यांचे उत्पादन कुठे झाले, त्यामध्ये कोणते घटक वापरण्यात आले आणि ते ग्राहकांपर्यंत कोणत्या प्रक्रियेतून पोहोचले, याचा मागोवा घेणेही कठीण होते. त्यामुळे मसाल्यांचे योग्य पद्धतीने पॅकिंग आणि सीलिंग करूनच त्यांचे वितरण व विक्री करणे आवश्यक आहे. उत्पादनाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि संपूर्ण पुरवठा साखळीचा मागोवा घेता येणे या बाबींना प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. मसाल्यांच्या उत्पादनासाठी आणि साठवणुकीसाठी स्वच्छ, कोरडे, कीटकमुक्त आणि दूषितीकरणापासून सुरक्षित परिसर असणे आवश्यक आहे. डांबरी पृष्ठभागावर, गटाऱ्यांजवळ, कचराकुंड्यांच्या परिसरात किंवा जनावरांच्या गोठ्याजवळ मसाले वाळवता येणार नाहीत. हे नियम बंधनकारक असून, त्यांचे उल्लंघन करण्यास परवानगी नसल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले.

# पाचही मारेकऱ्यांना ओळखतो, हत्येत सहभाग नसल्याचा दावा



**ठाणे** : ठाण्यातील मानपाडा आणि मनोरमानगर परिसरातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या निर्घृण हत्याकांडाच्या तपासाला आता अत्यंत वेगवान आणि सनसनाटी वळण मिळाले आहे. शिंदे सेनेच्या माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांचे पती राजेंद्र शिंदे यांची ठाणे गुन्हे शाखेने तब्बल ९ तास कसून चौकशी केली. या चौकशीदरम्यान पोलिसांनी पूर्णेकरांच्या मारेकऱ्यांना आणि राजेंद्र शिंदे यांना समोरासमोर बसवून उलटतपासणी केली. या 'फेस-टू-फेस' चौकशीदरम्यान राजेंद्र शिंदे यांनी, "मी पूर्णेकरांच्या सर्व मारेकऱ्यांना आधीपासूनच ओळखतो," अशी धक्कादायक कबुली दिल्याने या प्रकरणात आता राजकीय आणि गुन्हेगारी साटेलोटे उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जरी राजेंद्र शिंदे यांनी, "मारेकऱ्यांशी केवळ ओळखीचा संबंध असून हत्येच्या कटाशी माझा काहीही संबंध नाही," असा दावा केला असला, तरी त्यांच्या या कबुलीमुळे पूर्णेकर कुटुंबीयांनी केलेल्या गंभीर आरोपांना आता मोठा कायदेशीर व तपासात्मक आधार मिळाला आहे. ठाणे गुन्हे शाखेने मंगळवारी सकाळी राजेंद्र शिंदे यांना चौकशीसाठी पाचारण केले होते. पूर्णेकर यांच्या मुलाने केलेल्या जाहीर आरोपांनंतर पोलिसांनी तपासाचा फास आवळण्यास सुरुवात केली. गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या प्रमुख आरोपींना आणि राजेंद्र शिंदे यांना एकाच खोलीत समोरासमोर बसवले. आरोपींची विधाने, कॉल रेकॉर्ड्स आणि गुप्त बैठकांबाबत शिंदेंवर प्रश्नांची भडीमार करण्यात आला. चौकशीदरम्यान राजेंद्र शिंदे यांनी पोलिसांना सांगितले, "अटकेत असलेले पाचही संशयित आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. ते माझ्याकडे कामाच्या शोधात यायचे. माझी पत्नी त्या प्रभागाची लोकप्रतिनिधी आणि ज्येष्ठ नगरसेविका असल्याने परिसरात अनेक कार्यकर्त्यांच्या आणि लोकांच्या भेटीगाठी होत असतात. त्या ओळखीपलीकडे माझा त्यांच्याशी कोणताही व्यवहार नाही आणि पूर्णेकरांच्या हत्येत माझा काडीमात्र सहभाग नाही.“प्रदीप पूर्णेकर यांचे सुपुत्र राम पूर्णेकर यांनी हत्येच्या पहिल्या दिवसापासून माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांच्यावर हत्येचा कट रचल्याचा उघड आरोप केला होता. "माझ्या वडिलांची हत्या होण्यापूर्वी काही दिवस आधी मी स्वतः आरोपींना राजेंद्र शिंदे राहत असलेल्या 'निळकंठ' इमारतीबाहेर पाहिले होते. याच इमारतीत मारेकऱ्यांसोबत संशयास्पद बैठका झाल्या आणि माझ्या वडिलांच्या हत्येची पूर्ण योजना आखण्यात आली," असा थेट आरोप राम पूर्णेकर यांनी केला होता. राजेंद्र शिंदे यांनी मारेकऱ्यांशी पूर्वपरिचय असल्याची कबुली दिल्यानंतर, राम पूर्णेकर यांच्या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट होत असून, गुन्हे शाखा आता त्या दिशेने पुरावे गोळा करत आहे. २९ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास ठाण्यातील मनोरमानगर येथील कार्यालयात बसलेले असताना प्रदीप पूर्णेकर यांच्यावर पाच मारेकऱ्यांनी जीवघेणा हल्ला चढवला होता. कार्यालयात अचानक घुसून हल्लेखोरांनी पूर्णेकरांवर थेट गोळ्या झाडल्या आणि त्यानंतर धारदार कोयत्याने सपासप वार करून त्यांची जागेवरच निर्घृण हत्या केली होती. ठाणे गुन्हे शाखेने तातडीने कारवाई करत सुभाष उर्फ पप्या शिंदे, संतोष कनोजिया उर्फ टल्ली, अमित जयकिशन सिंग उर्फ पपलू, निखिल यादव आणि नितेश पवार उर्फ भावड्या या पाच मारेकऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६

# डॉ. इं.भा.पा. महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग, मराठी विभाग आणि विद्यार्थी संसद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमातून विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानार्जनाची प्रेरणा देणे आणि लेखनकौशल्याला प्रोत्साहन देणे हा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. यावेळी विद्यार्थी संसद विभागप्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. परभाणे, मराठी विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी देव आणि डॉ. प्रेमला मुखेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचा परिचय विद्यार्थिनींना करून दिला. कलाम यांची ज्ञानाविषयीची जिज्ञासा, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, कठोर परिश्रम, वाचनाची आवड आणि ध्येयप्राप्तीसाठीची जिद्द या गुणांवर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थिनींनी नियमित वाचनाची सवय जोपासावी, विविध विषयांचे ज्ञान आत्मसात करावे आणि सातत्यपूर्ण अध्ययनातून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले.वाचनामुळे व्यक्तीच्या विचारविश्वाचा विस्तार होतो, चिकित्सक वृत्ती विकसित होते आणि अभिव्यक्तीला नवी दिशा मिळते. याच उद्देशाने महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना स्वतंत्रपणे विचार करण्याची, आपले विचार लेखनातून प्रभावीपणे मांडण्याची आणि सर्जनशीलतेला वाव देण्याची संधी उपलब्ध झाली.वाचन संस्कृती रुजविणे, ज्ञानाची गोडी निर्माण करणे आणि विद्यार्थिनींच्या बौद्धिक व वैचारिक विकासाला चालना देणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# वनहक्क दावेदारांच्या पीकांचे पंचनामे करुन भरपाई देण्याची मागणी




**कन्नड (अरुण थोरात) :** शासनाने दुष्काळ जाहिर केल्याने कन्नड तालुक्यातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनहक्क दावेदारांच्या शेतपिकांचे ही पंचनामे करुण नुकसान भरपाई देण्याची मागणी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा व सत्यशोधक शेतकरी सभेच्या वतीने करण्यात आली आहे.राज्यासह कन्नड तालुक्यात शासनाने दुष्काळ जाहिर केला आहे. त्यानुषंगाने शेतपिकांचे पंचनामे करण्यात येत आहे. परंतू हे पंचनामे सातबाराधारक शेतीचे होत असल्याने, शासनाच्या वनहक्क कायद्यानुसार त्याचा लाभ कन्नड तालुक्यातील अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनहक्क दावेदारांना देण्यात यावा, वनहक्क दावेदारांची उभी पिके पावसा अभावी वाळून गेली आहेत. त्यामुळे अशा बाधीत शेतकर्यासमोर उदरनिर्वाह चा व पशुधन जगविण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहेत. शिवाय राज्यात ऊसाचे क्षेत्र घटले असल्याने ऊसतोडणी हंगाम लवकर संपणार आहेत. त्यामुळे उसतोडणी साठी जाणाऱ्या वनहक्कदावेदारां समोर गंभीर समस्या उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शासनाने 2020 च्या शासन निर्णया प्रमाणे या वर्षी ही निर्णय घेऊण अंमलबजावणी करीत तालुक्यातील सर्व पात्र व प्रलंबित वनहक्क दावेदारांना भरीव मदत द्यावी अशी मागणी तहसीलदार कन्नड यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. याप्रसंगी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे कन्नड तालुकाध्यक्ष कॉम्रेड रतन मधे, कॉम्रेड रावजी पथवे, कॉम्रेड दिनकर दाभाडे, जयराम पथवे, बुधा गावंडे, भावराव मधे, सखाराम वाजे, शामु बारकु गांगड, धोंडी गांगड, चंदर आगीवले, पुंडलिक राठोड, कडुबा नन्नवरे, आदी उपस्थित होते.

# ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेच्या मैदानी प्रशिक्षणासाठी वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड



**नांदेड, (प्रतिनिधी) :** वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाची विद्यार्थिनी खुशी चावरे हिने २० किलोमीटर चालण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक तर पल्लवी भालेराव हिने रौप्यपदकावर आपले नाव कोरले.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि के. के. एम. महाविद्यालय, मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेंटर झोन मैदानी स्पर्धेत विद्यार्थिनींनी हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नियमित सराव, कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामागे महाविद्यालयातील क्रीडा प्रशिक्षक तथा राज्य पंच प्रा. डॉ. महेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. शेखर घुंगरवार यांनी दोन्ही गुणवंत खेळाडूंचा सत्कार केला. आगामी ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी मैदानी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. विष्णू राठोड , से. नि . कार्यालयीन अधीक्षक रामराव राठोड, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. डॉ. साहेबराव मोरे , प्रा. डॉ. राहुल सरोदे उपस्थित होते.या दोन्ही विद्यार्थिनींची ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेच्या प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाल्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नियमित सराव, योग्य मार्गदर्शन आणि दृढ इच्छाशक्ती यांच्या बळावर विद्यार्थिनींनी मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.महाविद्यालयातील खेळाडूंना प्रोत्साहन देणारे प्राचार्य, प्रशिक्षक आणि शिक्षक यांच्या सहकार्यामुळे क्रीडा क्षेत्रात महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

# इकरा पब्लिक स्कूलमध्ये ‘वाचन प्रेरणा दिन’ उत्साहात साजरा



**जळगाव (प्रतिनिधी) :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जळगाव येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ‘वाचन प्रेरणा दिन’ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक साजिद खान, मोहसिन खान आणि इश्तियाक अहमद यांनी वाचनाचे महत्त्व विशद करणारी भाषणे केली.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होणे, ज्ञानाची व्याप्ती वाढवणे आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचनाची सवय जोपासणे किती आवश्यक आहे, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.तसेच डॉ.कलाम यांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी पैलूंवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना गोष्टींच्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांविषयी आवड निर्माण होण्यास आणि वाचनसंस्कृती रुजण्यास प्रोत्साहन मिळाले.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरला तो इयत्ता पाचवीचा विद्यार्थी जोहान पिंजारी! त्याने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्यासारखा संपूर्ण वेश परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.त्याच्या या अनोख्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरिफ खान यांनी केले.वाचनाची प्रेरणा देणारा आणि डॉ. कलाम यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


## जयभवानी महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात



**पाटोदा (प्रतिनिधी) :** जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग व लोकप्रशासन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी समुपदेशन व व्यावसायिक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन उपविभागीय दंडाधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ. आश्विन राजनिकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते, तर प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले.आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांसमोर करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र, योग्य क्षेत्राची निवड, स्वतःच्या क्षमता व आवडीची ओळख, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधींची माहिती यांसाठी समुपदेशनाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर उपलब्ध असलेल्या विविध व्यावसायिक संधींची जाणीव व्हावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि भविष्यातील करिअरविषयक निर्णय घेण्यासाठी योग्य दिशा मिळावी, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.उद्घाटक श्रीमती वसीमा शेख, प्रमुख पाहुणे डॉ. आश्विन राजनिकर आणि प्रमुख मार्गदर्शक श्री शिवाजीराव पंडित कला विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गेवराईचे प्राचार्य विश्वास कदम तर अध्यक्ष प्राचार्य सदाशिव सरकटे होते प्राचार्य कदम यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनिवडी, क्षमता आणि कौशल्ये ओळखून ध्येय निश्चित करावे, तसेच उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून स्वतःचे भविष्य घडवावे, या दृष्टीने कार्यशाळा उपयुक्त ठरली. उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक व लोकप्रशासन विभाग प्रमुख तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची भूमिका व उद्देश स्पष्ट केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर इंग्रजी विभागाचे प्रा. विनोद किर्दक यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना करिअरविषयक योग्य दिशा देणारा हा उपक्रम महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक बांधिलकीचा महत्त्वपूर्ण भाग म्हणुन या कार्यशाळेकडे बघितले जाते.

## मेवापूर शाळेत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती उत्साहात साजरी



**अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हापरिषद प्राथमिक शाळा मेवापुर तालुका जळकोट येथे मिसाईल मॅन भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री गोपीनाथ केंद्रे सर,नारायण पाटील सर, राजु नागरगोजे सर , शमाबी शेख व सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी श्री नारायण पाटील सर यांनी मिसाईल मॅन डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राचा इतिहास विद्यार्थ्यांन पुढे मांडला तसेच प्रत्येक विद्यार्थ्याकडून वाचन घेण्यात आले व शाळेत निबंध स्पर्धा आयोजन करण्यात आले श्री नारायण पाटील सर नी विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप केले तसेच राजू नागरगोजे सरानी आपल्यामनोगत नंतर आभार मानले.

## समुद्राळ - कलदेव निंबाळा - सालेगाव रस्त्याची तातडीने दुरुस्ती करा; अन्यथा रास्ता रोको आंदोलन



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कलदेव लिंबाळा _सालेगाव रस्त्याची अत्यंत दुर्दशा झाली असून त्याची वेळीच दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुनीता पावशेरे यांनी बांधकाम विभागाला दिला आहे. गावातील पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी सिमेंट नालीचीही मागणी. समुद्राळ—कलदेव निंबाळा—सालेगाव हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील डांबरी रस्ता अत्यंत खराब झाला असून, या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी कलदेव निंबाळा ग्रामपंचायत गटनेत्या तथा राष्ट्रवादी जिल्हा महिला आघाडी उपाध्यक्ष सुनीता देविदास पावशेरे यांनी उपविभागीय अभियंता एन. बी सगर यांच्याकडे ग्रामपंचायत ठरावासह केली आहे. या रस्त्यावरून लोहारा, मुरूम, सास्तूर, नारंगवाडी आदी भागांकडे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असते. मात्र, रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनधारक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला असून, ग्रामस्थांकडून सातत्याने तक्रारी केल्या जात आहेत.यापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली होती; मात्र काही काळातच रस्ता पुन्हा खराब झाला. त्यामुळे संबंधित बांधकाम विभागाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन रस्त्याच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी आवश्यक निधी मंजूर करावा, अशी मागणी पावशेरे यांनी केली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास वाहनधारक, प्रवासी आणि ग्रामस्थांच्या वतीने रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.गावात नाल्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. कारण पावसाळ्यात समुद्राळ गावाकडून येणाऱ्या नाल्यातील पाणी दरवर्षी कलदेव निंबाळा गावातील शाळा,वस्तीत शिरत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी गावातील मुख्य रस्त्यालगत सिमेंट नाली बांधण्यात यावी, अशी दुसरी मागणीही सुनीता पावशेरे यांनी केली आहे. सदर निवेदन या विभागाचे अभियंता रोहित चव्हाण यांनी स्वीकारले.संबंधित विभागाने या दोन्ही मागण्यांची तातडीने दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा नागरिकांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्समध्ये 'कलाम रीडॅथॉन २०२६ - त्रिभाषा वाचन प्रेरणा सप्ताह'चा शानदार शुभारंभ

**दौलताबाद (जावेद अहमद) :** स्थानिक अंजना स्कूल ऑफ एक्सलन्समध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा आणि वाचनातून एक ज्ञानसंपन्न व विचारशील पिढी घडावी, या उद्देशाने 'कलाम रीडॅथॉन २०२६ — त्रिभाषा वाचन प्रेरणा सप्ताह' या विशेष उपक्रमाचा शानदार शुभारंभ करण्यात आला.हा विशेष वाचन सप्ताह १५ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहामध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांच्या समृद्धीसाठी विविध वाचन स्पर्धा आणि उपक्रम राबविले जाणार आहेत.यात प्रामुख्याने,अभिवाचन स्पर्धा व कथाकथन,उतारा वाचन आणि वाचन आकलन ,शब्दसंपत्ती विकास व पुस्तक परीक्षण,प्रेरणादायी साहित्याचे वाचन, उद्याचा विचारवंत' संकल्पना:आजचा वाचक, उद्याचा विचारवंत आणि भविष्यातील सक्षम नेतृत्व' या मुख्य संकल्पनेवर हा संपूर्ण उपक्रम आधारित आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांची उच्चारशुद्धता सुधारणे, भाषिक अभिव्यक्ती प्रगल्भ करणे, तसेच त्यांची कल्पनाशक्ती आणि चिकित्सक विचारक्षमता विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.या उद्घाटनपर कार्यक्रमाप्रसंगी शाळेच्या प्राचार्या सौ. स्नेहा पवार, व्यवस्थापक देव साठे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


## नवदुर्गा : लेखमाला -1







गेल्या वर्षी याच महिन्यामध्ये, पदरामध्ये दोन लेकरं टाकून तिच्या शेतकरी नवऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली, नेहा ताईच्या नशिबी 25 व्या वर्षी विधवापण आल.झालेल्या दु:ख इतकं मोठं होतं की त्यांना आई-वडिलांकडे माहेरी यावं लागलं. एकुलता एक मुलीला, असे भोग भोगावे लागत आहे हे पहा ना म्हणजे आई-वडिलांचे काळीज मिळून टाकणार होत. पुरुष हार मानतात आणि आयुष्य संपवतात परंतु आपली भारतीय स्त्री कधीही हार मानत नाही, परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी ती सदैव तत्पर असते. आजची नवदुर्गा नेहाताई, यांची गोष्ट आजच्या सर्व महिलांसाठी प्रेरणा देणारी आहे. नवरा गेल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये हार न मानता, आत्महत्या न करता, संकटाशी दोन हात करण्यासाठी त्या सज्ज झाल्या होत्या.मे महिन्याच्या कडक उन्हात, मराठवाड्याचा दौरा करत होतो, तेव्हा परभणी जिल्ह्यात एका छोट्या गावात दराडे कुटुंबातील दोन मुलं निवडायला गेलो. मुले निवडणे म्हणजे स्नेहवन संस्थेमध्ये त्यांची पहिलीपासून पंधरावी पर्यंत संपूर्ण जबाबदारी आम्ही घेतो परंतु ती घेण्याआधी त्याची सर्व परिस्थिती जाऊन पाहतो. दराडे ताईंच्या दोन्ही मुलांना स्नेहवनमध्ये ॲडमिशन दिल, तिथे नेहा ताईंची मुलगी होती. एका आजीने सांगितले की या मुलीचा बापही आत्ताच गेला आहे. मुलगी इतकी कुणाची होती किती ना एकटी नाही मला गाडीत बसून पाच किलोमीटर वरती दुसऱ्या गावात तिच्या आईच्या भेटीला घेऊन गेली. चार वर्षाचा एक छोटा गोलू, रुद्रा त्याच नाव, ज्याला माहितीही नव्हतं की सध्या घरात काय परिस्थिती चालू आहे, माझ्या डोळ्यात टचकन पाणी आलं...नेहा ताईला आपल्या मदतीची खरंच गरज आहे हे आता कुणीही सांगायची गरज पडत नव्हती. नेहा ताईला भेटल्यानंतर मी म्हटलं की," नेहाताई तुम्ही स्नेहवनमध्ये चला आपण तुमचं पुढचं शिक्षण करू आणि मुलांनाही चांगलं सांभाळू, त्यांना चांगलं शिक्षण देऊ". नेहाताई आमच्यावर विश्वास ठेवून जून महिन्यात स्नेहवनमध्ये आल्या, त्यांना आपण दर महिन्याला मानधन देतो. रुद्रा आणि सायली दोघेही जण स्नेहवनमध्ये छान शिक्षण घेत आहेत. तिघेही आपल्या कुटुंबाचा भाग झाले आहेत.दोन दिवसापूर्वी नेहाताईची आई त्यांना भेटायला स्नेहवन मध्ये आल्या होत्या, नातवंड आणि आपली लेक आनंदाने राहत आहेत हे पाहून त्यांना समाधान वाटलं. देवीच्या पहिल्या आरतीचा मान नेहा ताईंना दिला होता, तेव्हा दुर्गा मातेलाही या लेकीचा अभिमान वाटत असेल यात शंका नाही. गावाच्या बाहेर पडलो तर लोक काय म्हणतील, समाजाच्या नींदेला आणि चाली रीतींना झिडकारून नेहाताई सारखी हिंमत आज प्रत्येक खेड्यातल्या स्त्रीने दाखवणे गरजेचे आहे. नवरा दारू पितो, रोज मारतो, परंतु बाई गपगुमान ते सहन करते. नवरा गेल्यानंतर खेड्यामध्ये पुर्नविवाह करता येत नाही, पुढचं अख्खा आयुष्य विधवा म्हणून काढावे लागतात. बहिणींनो, गाव सोडून बाहेर पडायची हिम्मत जर तुम्ही आज दाखवली तर तुम्ही तुमचं आणि मुलांचं भविष्य उज्वल करू शकता. राम कृष्ण हरी. आपल्या ओळखीत अशा एखाद्या बहिणीला, तिच्या लेकरांना मदतीची गरज असेल तर संपर्क करा.पत्ता-स्नेहवन संस्था, कोयाळी फाटा, आळंदी वडगाव घेनंद रोड, पुणे.संपर्क - 7875501502

**भगवंत पाळवदे**
**अंबाजोगाई /बीड**






## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील डॉ. माधव अंभोरे यांना "राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार"प्राप्त




**फुलंब्री** : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. माधवराव अंभोरे यांना "राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार" स्विफ्ट अँड लिफ्ट या एनजीओ संस्थेकडून देण्यात आला. प्रस्तुत पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील अध्यापन अनुभव व संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल देण्यात आला. यावेळी हा पुरस्कार भाजपाचे जिल्हा शहराध्यक्ष, मा. श्री किशोर शितोळे साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहीम, मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना), संस्थेचे सचिव मा. श्री निवृत्ती पा. गावंडे, संचालक, प्राचार्य, डॉ. सर्जेराव ठोंबरे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले व महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व कर्मचारी यांनी डॉअंभोरे सरांचे अभिनंदन केले.

## बोलक्या बाहुल्यांच्या माध्यमातून पदवीधर मतदारसंघ मतदान जनजागृती




**पानवढोद** : आगामी पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सुशिक्षित मतदारांचा टक्का वाढावा आणि लोकशाही अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने आज पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाला, पानवढोद येथे एका अत्यंत नाविन्यपूर्ण मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे गट विकास अधिकारी पंचायत समिति सिल्लोड, श्री पगार साहेब, गट शिक्षणाधिकारी श्री महाजन साहेब, व विस्तार अधिकारी श्री फुसे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली श्रीमती सरला शामराव कामे आणि ललिता काशिनाथ कामे यांनी 'बोलक्या बाहुल्यांच्या' (Puppetry/Ventriloquism) माध्यमातून केलेले प्रबोधन! केवळ भाषणबाजी न करता, करमणुकीतून प्रबोधन साधत त्यांनी पदवीधर मतदारांना त्यांच्या हक्काची आणि कर्तव्याची जाणीव करून दिली.कार्यक्रमातील ठळक वैशिष्ट्ये: * अनोखी सादरीकरण पद्धत: बोलक्या बाहुल्यांच्या संवादातून मतदानासारखा गंभीर विषय अत्यंत रंजक आणि सोप्या पद्धतीने मांडण्यात आला. पदवीधराने मतदार यादीत आपले नाव नोंदवणे (फॉर्म १८ भरणे) आणि मतदानाच्या दिवशी न चुकता आपला मतदानाचा हक्क बजावणे कसे आवश्यक आहे, हे या सादरीकरणातून पटवून देण्यात आले. जिल्हा परिषद प्रशाला पानवढोद येथील सर्व शिक्षक, कर्मचारी, आणि भावी मतदार असलेल्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त दाद दिली.श्रीमती सरला कामे आणि ललिता कामे यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सुशिक्षित समाज आणि तरुणाईने अशा प्रबोधनातून प्रेरणा घेऊन आगामी निवडणुकीत १००% मतदान करावे, हाच यामागचा मुख्य हेतू होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


## चिकलठाणा शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** शाळेचे मुख्याध्यापक माननीय श्री. वसंत राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आज मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत भारताचे माजी स्वर्गीय राष्ट्रपती तथा मिसाइल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात आला .याप्रसंगी डॉ. एपीजेअब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी तसेच त्यांच्या कार्यांना उजाळा देण्यासाठी विद्यार्थ्यांची भाषणे तसेच त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित सामान्य ज्ञान प्रश्नमंजूषा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले. वाचलेल्या पुस्तकांवर इ. 10च्या मनिषा उबाळे आणि समरीन सय्यद तसेच राधेश्याम गिरी यांनी समीक्षा सादर केली.डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांचे सुलेखन विद्यार्थ्यांनी केले. त्याचप्रमाणे वाचन प्रेरणा दिन सप्ताह ची सुरुवात आजपासून करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच सेवक वर्गाने परिश्रम घेतले.

## देवगिरी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** याप्रसंगी उपप्राचार्य श्री. अरुण काटे सर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "मोबाईलच्या युगात देवगिरी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ विज्ञान विभागाचे उपप्राचार्य श्री. अरुण काटे होते. प्रारंभी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांनी विविध भाषणानधून, लिखाणामधून व्यक्त केलेल्या, पुस्तकांचे महत्त्व सांगणारे Quotations चे वाचन केले. तसेच विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन करून वाचन प्रेरणा दिवस साजरा केला. वाचन संस्कृती टिकवणे गरजेचे आहे. वाचनाने माणूस विचारांनी समृद्ध होतो." वाचन फक्त आजच्या दिवसापुरते न करता रोज नियमित वाचन करण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजन राजपूत यांनी केले. कार्यक्रमास पर्यवेक्षक डॉ. किरण पतंगे, पर्यवेक्षिका, श्रीमती. अनघा देशपांडे, श्रीमती. आढाव मॅडम, सुर्यवंशी मॅडम, वर्षा पाटील मॅडम, श्रीमती. सावंत मॅडम, श्री. जगताप सर तसेच शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचन प्रेरणा दिन, जागतिक पांढरी काठी दिन व हात धुवा दिन उत्साहात साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कंटेकुर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन, जागतिक पांढरी काठी दिन आणि जागतिक हात धुवा दिनानिमित्त विविध शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, दृष्टिबाधित व्यक्तींच्या अडचणींबाबत जाणीव जागृती करणे तसेच वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयींचे महत्त्व पटवून देण्याचा संदेश देण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. सुरवातीस डॉ. ए. पी. जी. कलम यांच्या प्रतिमेचे पूजन लक्षण येवते यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. कलाम यांना वाचनाची विशेष आवड होती. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांसाठी सदैव प्रेरणादायी आहे. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे महत्त्व सांगण्यात आले. पुस्तकांमुळे ज्ञानात भर पडते, शब्दसंपत्ती वाढते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, हे उपक्रमशील शिक्षक विजयकुमार कलशेट्टी यांनी समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांसोबतच गोष्टींची पुस्तके, चरित्रे, वर्तमानपत्रे, विज्ञानविषयक साहित्य आणि थोर व्यक्तींचे विचार यांचेही नियमित वाचन करावे, असे आवाहन करण्यात आले. 'दररोज वाचन करूया, ज्ञानाचा नवा मार्ग शोधूया', 'वाचाल तर वाचाल' आणि 'पुस्तकांशी मैत्री, ज्ञानाची प्रगती' अशा घोषवाक्यांद्वारे वाचनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यात स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक पांढरी काठी दिन म्हणून साजरा केला जातो. पांढरी काठी ही दृष्टिबाधित व्यक्तींसाठी केवळ चालण्याचे साधन नसून ती स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सुरक्षिततेचे प्रतीक आहे. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांना दृष्टिबाधित व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी, त्यांच्यासाठी उपलब्ध असलेली सहाय्यक साधने आणि समाजाने त्यांना सहकार्य करण्याची आवश्यकता याविषयी माहिती देण्यात आली. दृष्टिबाधित व्यक्तींना रस्ता ओलांडताना, सार्वजनिक ठिकाणी वावरताना तसेच विविध कामे करताना सहकार्य करणे आवश्यक आहे. मात्र, मदत करताना त्यांची परवानगी घेऊन आदरपूर्वक मदत करावी, हेही विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. दृष्टिबाधित व्यक्तींना दयेची नव्हे, तर समान संधी, आदर आणि सहकार्याची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही क्षमता असते. योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास दिव्यांग व्यक्तीही शिक्षण, क्रीडा, कला, विज्ञान आणि इतर क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात आला. 'दृष्टिबाधितांचा सन्मान करूया, समावेशक समाज घडवूया' आणि 'समान संधी, समान हक्क' या संदेशांतून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देण्यात आली. दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा केला जातो. हातांची योग्य प्रकारे स्वच्छता राखणे हा अनेक संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्याचा सोपा आणि प्रभावी उपाय आहे. अस्वच्छ हातांमुळे जंतू शरीरात प्रवेश करू शकतात आणि त्यामुळे अतिसार, पोटाचे विकार तसेच इतर संसर्ग होण्याचा धोका वाढतो. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांना साबण आणि स्वच्छ पाण्याने हात धुण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर, बाहेरून आल्यानंतर, खोकल्यानंतर किंवा शिंकल्यानंतर तसेच हात अस्वच्छ झाल्यास हात स्वच्छ धुणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. हात धुताना तळहात, हातांची पाठ, बोटांमधील जागा, अंगठे, नखांच्या आसपासचा भाग आणि मनगट यांची स्वच्छता करावी. हात साबणाने किमान २० सेकंद चोळून स्वच्छ पाण्याने धुवावेत, याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छ हात, स्वच्छ परिसर आणि निरोगी जीवन यांचा परस्पर संबंध विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छतेच्या सवयी अंगीकाराव्यात आणि आपल्या कुटुंबात तसेच समाजातही स्वच्छतेविषयी जनजागृती करावी, असे आवाहन करण्यात आले. वाचन प्रेरणा दिन, जागतिक पांढरी काठी दिन आणि जागतिक हात धुवा दिन हे तीनही दिन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. वाचनामुळे ज्ञानाची वाढ होते, पांढऱ्या काठी दिनामुळे दिव्यांगांविषयी संवेदनशीलता आणि सामाजिक समानतेची जाणीव निर्माण होते, तर हात धुवा दिनामुळे आरोग्य व स्वच्छतेच्या चांगल्या सवयी विकसित होतात.या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केवळ माहिती मिळवू नये, तर ती आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावी, हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. वाचनाची सवय, सर्वांप्रती आदरभाव आणि स्वच्छतेची जाणीव या तीन गुणांच्या आधारे सुजाण, संवेदनशील आणि आरोग्यसंपन्न नागरिक घडविण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, दृष्टिबाधित व्यक्तींविषयी आदरभाव आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी दृढ होण्यास निश्चितच मदत होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे यांनी केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक लतिफ लदाफ, जीवन सूर्यवंशी आणि लक्ष्मीबाई शिकारे यांचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


## दाभाडीत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



**दाभाडी (प्रतिनिधी) :** मौजे दाभाडी येथील स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त "वाचन प्रेरणा दिन" उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची ओढ वाढावी आणि ग्रामीण भागात वाचन संस्कृतीचा प्रसार व्हावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याचे स्मरण केले.याप्रसंगी श्री.अनिल शिरसाठ यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. जिद्द, मेहनत, ज्ञानलालसा आणि दूरदृष्टी यांच्या बळावर डॉ. कलाम यांनी देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण आणि ज्ञानाच्या जोरावर मोठे यश संपादन करता येते, हा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी. पुस्तकांच्या वाचनातून नवीन विचार, माहिती आणि अनुभव मिळतात. वाचनामुळे ज्ञानात भर पडण्याबरोबरच विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला ग्रामसेवक मुंडे साहेब, आकाश आदिक, अनिल शिरसाठ, रिंकेश आदिक, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजून घेण्यास आणि पुस्तकांशी मैत्री करण्यास प्रेरणा मिळाली.वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. विजय भोसले यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथालय कर्मचारी मुनिरा शहा यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणारे असे उपक्रम वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून, ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीला त्यातून निश्चितच चालना मिळेल, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला.

## शांताबाई वाघमारे यांचे निधन



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : शहरातील आदर्श नगर मध्ये राहणाऱ्या जेष्ठ महिला ग.भा.शांताबाई रंगनाथराव वाघमारे वय 82 वर्ष यांचे वृद्धपकाळाने बुधवार दि 14 ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर रात्री 9 वाजता शहरातील सार्वजनिक समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा,तीन मुली,जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे त्या उप शिक्षणाधिकारी परभणी तथा गट शिक्षणाधिकारी सेलू गजानन वाघमारे यांच्या आई होत.

# शंकरकाका



जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यात सुखनानदी काठी वसलेले माहेर भायगाव हे गाव तसे नकाशावर छोटेसे दिसते, पण या गावचा लौकिक मोठा आहे. या लौकिकामागे गावातील काही घराणी आणि काही व्यक्तींचे मोठे योगदान आहे. अशाच व्यक्तींमध्ये सर्वात आदराने आणि प्रेमाने नाव घेतले जाते ते म्हणजे शंकरराव लबडे पाटील यांचे. गावात लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत कोणीही त्यांना शंकरराव पाटील म्हणत नाही, सगळे त्यांना एकाच नावाने ओळखतात ते म्हणजे शंकर काका. या एका हाकेतच त्यांच्याबद्दलची आपुलकी, आदर आणि जवळीक दिसून येते. आज वयाची ८२वर्षे ओलांडली असली तरी त्यांच्या चालण्यात, बोलण्यात आणि विचार करण्यात जो रुबाब आहे, तो आजच्या तरुणालाही प्रेरणा देईल असा आहे.त्यांचे कुटुंब पाहिले की आजच्या काळात एक आश्चर्यच वाटते. आठ भाऊ आणि तीन बहिणी असलेले हे खूप मोठे कुटुंब एकाच वाड्यात, एकाच छताखाली गेल्या अनेक वर्षांपासून एकत्र नांदत आहे. आज दोन भाऊ एकत्र राहणे कठीण झाले असताना अकरा भावंडांचा हा संसार एकत्र ठेवणे हे महाकठीण काम शंकर काकांनी आपल्या मोठ्या मनाने आणि समजूतदारपणाने करून दाखवले आहे. या कुटुंबात कधीही मोठा वाद झाला नाही, असे नाही, पण तो वाद विकोपाला जाऊ न देता सामोपचाराने मिटवण्याची कला त्यांना अवगत आहे. गावात त्यांचा जो मोठा वाडा आहे, तो केवळ वीट, माती आणि दगडांनी बांधलेले घर नाही. तो वाडा म्हणजे गावचे एक न्यायालयच होते. गावात कोणाचेही भांडण झाले, कोणाचा वाद झाला, कोणाला काही अडचण आली की लोक थेट शंकर काकांच्या वाड्यावर यायचे. त्या वाड्याच्या ओसरीवर बसून अनेक तंटे मिटले आहेत, अनेकांना न्याय मिळाला आहे आणि अनेकांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे तो वाडा हे गावच्या आधाराचे प्रतीक बनले आहे. त्या वाड्याच्या भिंतींनी अनेक पिढ्यांचे सुख-दु:ख पाहिले आहे. आजही सणासुदीला, लग्नकार्याला तो वाडा माणसांनी गजबजलेला असतो.शंकर काका मूळचे शेतकरी आणि अत्यंत उत्तम शेतकरी म्हणून त्यांची ओळख आहे. सुखना काठच्या काळीभोर जमीन हीच त्यांची खरी संपत्ती. शेती करणे म्हणजे केवळ नांगरणी आणि पेरणी करणे नाही, तर जमिनीवर प्रेम करणे असते, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले आहे. आजही ते पहाटे लवकर उठून आपल्या शेताची पाहणी करायला जातात. कोणते पीक कसे आले आहे, पाण्याची काय परिस्थिती आहे, मजुरांना काय अडचण आहे, याची ते स्वतः जातीने चौकशी करतात. त्यांनी कधीही शेतमजुराला मजूर म्हणून वागणूक दिली नाही, तर त्याला आपल्या कुटुंबातील सदस्य मानले. त्यामुळे त्यांच्या शेतावर काम करणारा प्रत्येक माणूस त्यांना आपले मानतो. काळ बदलला, शेतीत नवीन तंत्रज्ञान आले, ट्रॅक्टर आले, ठिबक आले, पण जमिनीशी असलेली त्यांची नाळ कधीही तुटली नाही. कष्टाला पर्याय नाही, हा त्यांचा मंत्र आजही त्यांच्या पुढच्या पिढीने जपला आहे. सुखना नदीच्या पाण्यावर त्यांनी आपली शेती फुलवली आणि त्याच शेतीने त्यांना माणसे जोडायला शिकवले.राजकारणात त्यांचे नाव घेतले की निष्ठा हा शब्द डोळ्यासमोर येतो. स्वर्गीय माजी खासदार अंकुशराव टोपे साहेब यांचे ते अत्यंत विश्वासू आणि कट्टर समर्थक होते. टोपे साहेबांचे राजकारण म्हणजे या भागातील एक सुवर्णकाळ होता आणि त्या काळात टोपे साहेबांचे उजवे हात म्हणून शंकर काकांकडे पाहिले जायचे. टोपे साहेबांचा त्यांच्यावर इतका विश्वास होता की भायगाव आणि परिसरातील कोणतेही काम असले की टोपे साहेब शंकर काकांना विचारायचे. शंकर काका जो शब्द देतील, तो टोपे साहेब पाळणार, असा समजच होता. या विश्वासाच्या जोरावर शंकर काकांनी गावातील आणि परिसरातील अनेक लोकांची कामे करून दिली. कोणाचे पाणी प्रश्न, कोणाचे रस्त्याचे काम, कोणाची वैयक्तिक अडचण, अशी अनेक कामे त्यांच्या एका शब्दावर मार्गी लागत असत. पण या विश्वासाचा त्यांनी कधीही स्वतःच्या स्वार्थासाठी वापर केला नाही. त्यांनी नेहमी समाजाच्या हिताचाच विचार केला. आज राजकारणात लोक सकाळी एका पक्षात आणि संध्याकाळी दुसऱ्या पक्षात जातात, अशा काळात शंकर काकांनी आपली निष्ठा कायम ठेवली आहे. टोपे साहेबांच्या पश्चातही ते त्याच तळमळीने माजी मंत्री राजेश भैय्या टोपे साहेब यांच्या सोबत खंबीरपणे उभे आहेत. ही निष्ठा आजच्या तरुण कार्यकर्त्यांसाठी खूप मोठी शिकवण आहे. राजकारण म्हणजे केवळ पद मिळवणे नाही, तर विचारांशी आणि माणसांशी प्रामाणिक राहणे असते, हे त्यांच्या जीवनातून शिकायला मिळते.गावचे माजी सरपंच म्हणूनही त्यांचा कार्यकाळ गौरवास्पद राहिला आहे. सरपंच असताना त्यांनी गावात अनेक विकासकामे केली, पण ती करताना कधीही कोणत्या जातीचा किंवा गटाचा विचार केला नाही. सर्वांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची भूमिका होती. गावात शांतता आणि सलोखा कसा राहील, याकडे त्यांचे विशेष लक्ष असायचे.अनेक दिवसांपासून शंकर काकांची भेट घेण्याची इच्छा मनात होती. कारण त्यांच्याकडून खूप काही ऐकण्यासारखे आणि शिकण्यासारखे असते. नुकतीच त्यांच्या वाड्यावर जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या वयाचा विचार करता ते थकलेले वाटतील असे वाटले होते, पण प्रत्यक्षात तसे काहीच नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावर तेच तेज होते, बोलण्यात तोच आत्मविश्वास होता. गप्पा मारता मारता त्यांनी जुन्या काळातील अनेक राजकीय किस्से सांगितले. अंकुशराव टोपे साहेबांसोबतच्या आठवणी, त्यांच्या निवडणुकांच्या प्रचारातील गंमती जमती, त्या काळातील राजकारण कसे चालायचे, या सगळ्या गोष्टी त्यांनी इतक्या सुंदर पद्धतीने सांगितल्या की तो काळ डोळ्यासमोर उभा राहिला. आजच्या सोशल मीडिया आणि पैशाच्या राजकारणापेक्षा त्या काळचे राजकारण हे माणसांच्या विश्वासावर आणि नात्यांवर चालायचे, हे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होते. या गप्पांच्या ओघात त्यांनी मला सांगितले की तुम्ही आमचे आणि आमच्या परिसराचे नाव खूप मोठे केले. त्यांच्या या एका वाक्यात माझ्यासाठी मोठा आशीर्वाद होता आणि त्यांच्या मनात असलेला अभिमानही होता. त्यांचे आणि आमचे संबंध हे आजचे नाहीत, तर अनेक वर्षांपासूनचे आहेत. त्यांच्या पुढच्या पिढीशी, त्यांच्या मुलांशी आमचे तसेच जिव्हाळ्याचे आणि स्नेहाचे संबंध आहेत. हीच तर खरी माणुसकीची श्रीमंती आहे.आजच्या तरुण पिढीने शंकर काकांच्या जीवनाकडे पाहिले पाहिजे. एकत्र कुटुंब कसे टिकवायचे, शेतीवर कसे प्रेम करायचे, राजकारणात निष्ठा कशी जपायची आणि वय झाले तरी आपला उत्साह आणि आपुलकी कशी टिकवून ठेवायची, हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. ते केवळ एक व्यक्ती नाहीत, तर ते एक चालते बोलते विद्यापीठ आहेत, अनुभवाचा अथांग सागर आहेत. सुखना काठच्या या माणसात सुखना नदीसारखीच शांतता, खोली आणि सातत्य आहे.काका आजही जसे होते तसेच आहेत. काकांना भेटून पुन्हा नमस्कार करून मी निघालो. काका दरवाजात उभे राहून मला निरोप देताना एवढंच म्हणाले, सर गावाकडे आले की, येत जा! हे घर तुमचेच आहे. हा काका आणि आमचे सारे कुटुंब सदैव तुमच्या सोबत आहे.काकांचे हे शब्द माझ्या काळजावर कोरले गेले ते कायमचेच. हेच शब्द तर या माणसाची खरी ओळख आहेत. पद, पैसा, प्रतिष्ठा यापेक्षा माणसे जोडण्यात जो आनंद आहे, तो त्यांना कळला आहे. म्हणूनच माहेर भायगावच्या मातीत शंकरकाकांचे नाव आजही आदराने घेतले जाते आणि उद्याही घेतले जाईल. सुखना वाहत राहील आणि तिच्या काठी अशा माणसांच्या आठवणी दरवळत राहतील.

**डॉ. शिवाजी हुसे**

**('सुखनाकाठची माणसं' या लेखमालेतील लेख)**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


## जिंतूर तालुक्यात अवैध सावकारीचा विळखा घट्ट; सर्वसामान्यांचे संसार उद्ध्वस्त, एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडण्याची वेळ

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यात सध्या अवैध सावकारीने डोके वर काढले आहे. शहरासह बोरी, चारठाणा, येलदरी, इटोली, आडगाव, बामणी, भोगाव, वागदरवाडी या मोठ्या गावांमध्ये शेती, लग्न, आजारपण आणि शिक्षणासाठी गरजू लोकांना हाताशी धरून अव्वाच्या सव्वा व्याज आकारले जात आहे. 10 टक्क्यांपासून ते 20 टक्के प्रतिमहिना इतके चक्रवाढ व्याज लावून सर्वसामान्यांची आर्थिक लूट सुरू आहे.वसुलीसाठी गुंडांचा वापर, दंडेलशाहीया अवैध सावकारांकडून केवळ व्याजच नव्हे, तर वसुलीसाठी गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून दमदाटी, शिवीगाळ, घरासमोर तमाशा करणे, कोऱ्या चेकवर आणि स्टॅम्प पेपरवर सह्या घेणे असे प्रकार सर्रास सुरू आहेत. कर्ज घेतलेल्या रकमेपेक्षा कित्येक पट व्याज वसूल करूनही मूळ रक्कम तशीच ठेवली जाते.एका सराफ व्यापाऱ्याला गाव सोडून पलायन करावे लागलेया जाचाचे ताजे उदाहरण म्हणजे जिंतूर शहरातील एका प्रतिष्ठित सराफ व्यापाऱ्याचे आहे. अवैध सावकारांच्या सततच्या त्रासाला आणि दंडेलशाही वसुलीला कंटाळून या व्यापाऱ्याला अखेर आपले घरदार, दुकान सोडून गावातून पळ काढावा लागला आहे. त्याने घेतलेल्या रकमेपेक्षा दुप्पट-तिप्पट रक्कम परत करूनही त्याचा छळ थांबत नव्हता, असे नागरिकांतून बोलले जात आहे. या घटनेमुळे तालुक्यातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण आहे.केवळ 12 अधिकृत सावकार, शेकडो बेकायदेशीर; फायनान्सच्या नावाखाली सुरू आहे लूट- पीडितांनी लेखी तक्रार करावी - सहकार निबंधक नांदापूरकर यांचे आवाहनअधिकृत फक्त 12, अनधिकृत शेकडोया प्रकरणी आम्ही सहकार निबंधक, सहकारी संस्था, जिंतूर कार्यालयात माहिती घेतली असता धक्कादायक वास्तव समोर आले. संपूर्ण जिंतूर तालुक्यात शासनमान्य केवळ 12 अधिकृत सावकार परवाना धारक आहेत. त्यामध्येही निम्म्याहून अधिक परवाने हे सोने तारण ठेवून कायदेशीर सावकारी करणाऱ्या सराफ व्यावसायिकांकडे आहेत. ते शासनाच्या नियमानुसारच व्याज घेतात आणि दरवर्षी त्यांचे हिशोब तपासले जातात.मात्र प्रत्यक्षात शहरात आणि गावागावात फायनान्स, मायक्रो फायनान्स, रोजगार बचत गट आणि खाजगी सावकारीच्या नावाखाली शेकडो लोक बिनापरवाना हा व्यवसाय करत आहेत. त्यांनी सहकार विभागाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.कायदा काय सांगतो?महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 नुसार, परवान्याशिवाय सावकारी करणे हा फौजदारी गुन्हा आहे. विनापरवाना सावकारी केल्यास 5 वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. तसेच परवाना असूनही जास्त व्याज आकारल्यास परवाना रद्द करण्याचा अधिकार सहकार निबंधकांना आहे.प्रशासनाचे आवाहन - घाबरू नका, लेखी तक्रार करायाबाबत सहकार निबंधक नांदापूरकर यांनी स्पष्ट केले की, "आमच्याकडे नोंद असलेल्या 12 परवानाधारकांचे आम्ही दरवर्षी ऑडिट करतो. पण अवैध सावकारांच्या विरोधात जोपर्यंत पीडित व्यक्ती समोर येऊन लेखी तक्रार देत नाही, तोपर्यंत आम्हाला कारवाई करणे अवघड जाते. लोक घाबरतात आणि तक्रार देत नाहीत, याचाच गैरफायदा हे अवैध सावकार घेतात.""जर कोणाला अवैध सावकाराने त्रास दिला असेल, जास्त व्याज घेतले असेल, तर त्यांनी आमच्या कार्यालयात येऊन लेखी अर्ज द्यावा. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवून आम्ही संबंधित सावकारावर कडक कायदेशीर कारवाई करू आणि पोलिसात गुन्हाही दाखल करू," असे आश्वासन त्यांनी दिले.तरी तालुक्यातील जनतेने अवैध सावकारांच्या जाळ्यात अडकू नये आणि अडकले असल्यास तात्काळ सहकार विभाग, जिंतूर किंवा स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## थेंबाची किंमत

असा दुष्काळ पडता,
कळे थेंबाची किंमत.
झाड लावून करावे,
सदा सर्वांनी हिंमत. १

एका माणसाने एक,
वृक्ष लागवड करा.
धरतीच्या पृष्ठभागी,
रंग हिरवाच भरा. २

झाली झाडांची कत्तल,
कुठे पडणार पाणी.
जमिनीचे वाढे धूप,
पाणी आटणारं राणी. ३

दुष्काळाच्या सावटात,
आता सारे जण आले.
पाण्याविना गावोगावी,
चिंतातूर लोक झाले. ४

ढग अडणार नाही,
विना वृक्षाच्या छायेत.
वृक्ष लागवड करा,
ढग पडेलं मायेत. ५

खूप सारे झाडे लावू,
आता दुष्काळ पळवू.
झाड लावूनिया उंच,
काळया ढगांना वळवू. ६

ढग पडून मायेत,
दिले वृक्षाला चुंबन.
हळुवार माळरानी,
आले थेंबांचे गुंजन. ७

थेंब थेंब साठवूनी,
करा पाण्याची बचत.
नदीजोड प्रकल्पाला,
करू सर्वांनी मदत. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम याची जयंती श्रमजीवीमध्ये उत्साहात साजरी



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील श्रमजीवी अध्यापक महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम याची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरपे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रम चे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. तेजस्विनी करंडे यांनी केले. प्राचार्य डॉ. विजय सरपे यांनी प्रा. अमोल इंगळे यांच्या माध्यमातून आपल्या संदेशात प्रशिक्षण्यार्थी समोर व्यक्त होताना,आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध आहे; परंतु त्या माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विवेकात रूपांतर करण्यासाठी वाचन आवश्यक आहे. पुस्तक हे आपल्याला नवे विचार देते, अनुभवांची समृद्धी देते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलते.डॉ. अब्दुल कलाम यांनी आपल्या जीवनातून सिद्ध केले की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ज्ञान, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर यश मिळविता येते.म्हणून आजच्या वाचन प्रेरणा दिनी आपण सर्वांनी एक संकल्प करूया — “दररोज वाचूया, नवे ज्ञान मिळवूया, स्वतः समृद्ध होऊया आणि आपल्या विद्यार्थ्यांमध्येही वाचनाची संस्कृती रुजवूया.”कारण, आजचा वाचनशील प्रशिक्षणार्थी उद्याचा ज्ञानसमृद्ध शिक्षक बनेल आणि ज्ञानसमृद्ध शिक्षकच उद्याची सक्षम पिढी घडवेल हा महत्वाचा संदेश दिला.प्रा. डॉ. प्रवीण कदम यांनी या संदर्भात मनोगत व्यक्त केले.जाधव धनेश, बेलकोणे पंकज, रुक्मिन जमादार,सुरवसे निकिता, किरवले स्वप्नाली या प्रशिक्षनार्थीनी मनोगत व्यक्त केले.व बेंबळगे राणी आभार मांडले यांनी केले.या प्रसंगी ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्रशिक्षणार्थी यांनी ग्रंथाचे वाचन केले.या प्रसंगी प्रा.देविदास चव्हाण, प्रा. भाऊ पवार,व प्रशिक्षणार्थी मोठया प्रमाणात उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६


# कोरोना कडिकाळातील माणूसकीचा झिरपा "उजेड पेरणारी माणसं": विद्रोही कवी साहेबराव मोरे




समाज घडविण्याच्या प्रक्रियेत जी माणसं अग्रभागी असतात त्यांची पाऊलवाट धरून चालतांना त्यांच्या जीवन प्रवासातील घटीत अघटीत, हित-अहित, चांगले -वाईट, सुख-दुःखाची किणार असा संमिश्र संघर्षाचा आदर्श संत, महंत, महापुरुषांच्या रुपाने असणं म्हणजे समाजाचे सामाजिक,सांस्कृतिक स्वास्थ्य अबाधित व ठणठणीत रहाणं होय. अशा व्यक्तीचित्रणांचा आरसा येणाऱ्या पिढीसाठी "आयडॉल" ठेवणं तितकंच महत्वाचं आणि अपरिहार्य. आजच्या अंधभक्ततेला खतपाणी घालणार्या विचारसरणीच्या दुषित सामाजिक वातावरणात वावरणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावरच्या अतरंगी छटा वाचण्याची व पत्रकार या नात्याने समाज मिडिया समोर आणण्याची अनोखी जबाबदारी आनंदा पाटील यांनी "उजेड पेरणारी माणसं" या पुस्तकातून पार पाडली आहे. नेते, महात्मे, लोकशिक्षक, समाजसुधारक, महापुरुष यांची चरित्रे पुढे ठेवतांनाच वर्तमानातील सेवाभावी व्यक्तीचित्रणांशी सांगड घालून वर्तमान पिढीला प्रेरणा प्रदान करून प्रगल्भ व प्रकाशित करण्यासाठी अशा नवोन्मैषि साहित्याची गरज आहे. आनंदा पाटील यांच्या पुस्तकाने ही उणीव काहीअंशी भरून काढली आहे .सामाजिक बांधणीत पत्रकाराची भूमिका महत्त्वाची असते. पत्रकारितेतील जागल्याचे स्थान तोडीपाणी व टि. आर. पी च्या वर्चस्ववादात धुसर होते आहे. आज पत्रकार 'पपेट' बनून राहिला आहे ही समाज मान्यता व मानसिकता खोडून काढणारी "उजेड पेरणारी माणसं"ही साहित्यकृती आहे असे मला वाटते. कोरोनाच्या अतिशय बिकट व निर्वाणीच्या काळात डॉक्टरातील देवमाणूस जितका जीवनदायी राहिला तितकेच आत्मिक बळ प्रदान करण्याचे काम शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक, औद्योगिक, प्रशासकीय व एन जी ओ समूहाच्या माध्यमातून सेवाव्रतींनी केले. "कटाक्ष" ह्या साप्ताहिक स्तंभ लेखनातून लेखकाने अशा बहुविध क्षेत्रातील निस्वार्थी, निर्मोही भावनेने समाजहितैषी कार्य करणाऱ्या व्यक्तीमत्वांचा संक्षिप्त धांडोळा प्रस्तुत पुस्तकात घेतला आहे. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात गाॅडफादर असतो , त्याच्या जीवनाला फुलविणाऱ्या, आकार देणार्या प्रेरणादायी आधारवड असणाऱ्या व्यक्तीचित्रणाची पुस्तके अनेक आहेत, परंतु सकल सामाजिक अव्यवस्थेची दखल घेऊन लिहिणाऱ्या, काम करणाऱ्या, सेवाभावी व्यक्तींचा दस्तावेज समाज व वाचकांपर्यंत पोहोचवावा ह्या हेतूने प्रेरित होउन हा ग्रंथ आनंदा पाटील यांनी प्रकाशित केला आहे, या अनुषंगाने हे पुस्तक साहित्यिक निकषावर न तोलता सामाजिकतेच्या अंगाने मोजमाप करणे आवश्यक ठरते. सामाजिक ढासळत चाललेल्या मूल्यांची जोपासना करण्यासाठी, अंधश्रद्धा, अनागोंदी अंधभक्ततेला संजीवनी देणारा काळाकुट्ट अंधार भेदण्यासाठी ही उजेड पेरणारी पेटती मशाल हाती घेतलेली माणसं समाजापुढे आणलीत ,या अनुषंगाने आनंदा पाटील कौतुक व गौरववास पात्र ठरले आहेत. पुस्तकाचे शीर्षक लक्षणीय असल्याने वाचता क्षणी आत्मतेज प्रज्ज्वलित झाल्याची अनुभूती देऊन जाते. "उजेड पेरणारी माणसं " अंधार पोकळी भेदून खर्याअर्थी समाजाला उचित प्रकाशवाट दाखवून भरकटलेल्या युवकांना ,माणसांना मुख्य प्रवाहात, जनमानसात आणून सोडतात. अशा सर्वसमावेशक ८४ व्यक्तींचा समावेश आनंदा पाटील यांनी पुस्तकात केला आहे.आंबेडकरी जलशातील प्रबोधनकार गायक प्रतापसिंग बोदडे, आंबेडकराईट झुंजार गीतकार सारंग पवार, औद्योगिक क्षेत्रात लोककल्याणकारी मशाल पेटविणारे प्रेमचंद कोटेचा, कॅरी बॅग निर्मूलन वसा घेतलेल्या पिशवीवाली बाई शैला सावंत, वारली चित्रकलेचा प्रचार प्रसार करणारे भालेराव,एकाच दिवसात ३६५ छायाचित्रांवर चारोळी लिहिणारे व्यंगचित्रकार प्रा बी. एन. चौधरी, कलापथक व किर्तनांच्या माध्यमातून समाज जागृती करणारे नाट्यकर्मी काशिनाथ गटमणे, नाट्य लेखक व दिग्दर्शक पांडुरंग घांग्रेकर, आर्थिक पाठबळ नसताना बिनभिंतीची शाळा भरविणारी वंचिताची दूत-वैशाली झाल्टे,स्मशानातील सोनं हा आगळावेगळा उपक्रम राबवून पर्यावरण क्षेत्रात अमीट ठसा उमटविणाऱ्या राजश्री सुरवाडे,कवी डॉ मिलिंद बागुल, प्रल्हाद खरे, राजेंद्र पारे, दिलीप घोडेस्वार, रमेश पवार आदींनीआपापल्या साहित्य सेवेतून सामाजिक समतेतील गढुळता नितळ करणारी सम्यक दृष्टी प्रदान केली डॉ रमेश सुर्यवंशी, वीरा राठोड, लतिका चौधरी, नवनाथ गोरे, सुभाषचंद्र वैष्णव, निंबाजी शिवरकर, दीपक तांबोळी यांच्या साहित्याचा समावेश पुस्तकाची जमेची बाजू म्हणणे संयुक्तिक ठरते. साहित्यिक आणि पत्रकारांच्या भाषिक मिलाफातून अवतरलेली व्यक्तिमत्त्व वाचकांच्या अवतीभवती रेंगाळत असतात. साधी, सरळ , अअंलकारिकता असलेली भाषा मनाला स्पर्शून जाते . प्रवाही अर्थपूर्ण शब्द योजना हे बलस्थान आहे. व्यक्तीचित्रणं व समीक्षण दोन्हीत गल्लत झाली आहे , अपवादात्मक समीक्षण समावेश टाळता आला असता .तथापी पत्रकार हा समाज निरिक्षक असतो , त्याच्या शोधक नजरेने टाकलेला "कटाक्ष" समाजबांधणीसाठी नक्कीच फलदायी ठरणारा आहे . त्या-त्या व्यक्तीमत्वात डोकावून, सर्वव्यापी संघर्ष व संघर्षातून उभी राहिलेली लेगसी प्रेरक उर्जा बनून माणसाला माणसात आणणारी नक्कीच आहे.पुस्तकाला कवी, लेखक, प्रकाशक देवा झिंजाड यांनी प्रास्ताविक दिले आहे, त्यांना आनंदा पाटील यांच्या शोध पत्रकारितेत समाजाकडे बघण्याचा सूक्ष्म दृष्टिकोन दिसतो. एका पत्रकाराची तटस्थताआणि एका लेखकाची संवेदनशीलता यांचा दुर्मिळ संगम आहे असे यथार्थ मत देवा झिझाडांनी व्यक्त केले आहे.प्रवासात काही माणसं अशी भेटतात, जी केवळ बातमी न राहता तुमच्या काळजावर ठसा उमटवून जातात ही लेखकाची अंतरीची ओलं आपुलकीचा ओलावा देणारी आहे समाजात उजेड पेरणारी माणसं आजही आहेत म्हणून समाज संवेदनशील व प्रगतिशील राहिला आहे हे लेखकाचे मनोगत बोलके वाटते. पेन पब्लिशिंग हाऊस पुणे ने अतिशय वाचनीय व सुलभ मुद्रण असलेला ग्रंथ उपलब्ध करून दिला. सुभाष घोडके यांचे मुखपृष्ठ पाहताच आशयाची कल्पना येते .प्रकाशपर्व व अंधार युगातील सीमारेषेवर उजेड पेरणारी माणसं, अज्ञानाचा तिमिर भेदून प्रज्ञा सूर्याच्या प्रखर तेजाकडे नेणारी आश्वासकता प्रत्ययकारीकतेने,कुशल कुंचल्यातून रेखाटली आहे. लक्षवेधी मुखपृष्ठ पुस्तकांची उंची वाढवते, एकुणात कोरोना काळात माणसाला माणूस म्हणून उभा करणारा हा माणुसकीचा झिरपा आनंदा पाटील यांच्या पुढील वाटचालीसाठी,लेखन प्रवासात चोहीकडे हीरवळ दाटविणारा ठरावा . पत्रकारितेसह माणसाच्या जीवनात उजेड पेरणार्या कसदार लेखनासाठी आनंदा पाटील यांना शुभेच्छा देतो!!!



**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरेर सर उजेड पेरणारी माणसं - ललित व्यक्तिचित्रण लेखक : आनंदा पाटील प्रकाशन:पेन पब्लिशिंग हाऊस पुणे किंमत:३३०/**

## शासनादेशात त्रुटी आहेत त्या दुरुस्ती करा, मंत्री मंडळ उपसमिती समोर अभ्यासु व महत्वाची मागणी

**मुंबई (प्रतिनिधी)** : मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या महत्त्वपूर्ण बैठक सह्याद्री विश्राम गृह मुंबई येथे संपन्न झाली. उच्च न्यायालयातील एस इ बी सी आरक्षणा विरोधातील सुनावणी बाबत अनेक कायदेशीर व घटनात्मक मुद्दे उच्च व सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी सविस्तर पणे उपस्थित केल्यामुळे मराठा आरक्षणा मंत्री मंडळ उपसमितीची एस इ बी सी आरक्षणा बाबत दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्वाची बैठक हस्तक्षेप याचिका कर्ते व विधिज्ञ यांचे उपस्थितीत राज्य शासन आयोजीत करणारआहे.या बैठकीत सविस्तर पणे बोलतांना उच्च व सर्वोच्च न्यायालया तील मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ता जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की,केजी ते पीजी पर्यंत मराठासमाजाला ओबीसी सारख्या सवलती साठी जी आर मध्ये दुरुस्ती आवश्यक असुन,मराठा समाजाला ओबीसी सारख्या सर्व सवलती के.जी. ते पी. जी. लेव्हल पर्यंत देतांना तांत्रिक,अतांत्रिक, वैद्यकीय शिक्षण,नोकरीतील नियुक्त्या बढती आदी सर्व सवलती लागु करून खाजगी विद्यापीठ, डिम्ड युनिवार्सिटी मध्ये सुद्धा ओ.बी.सी सारख्या सवलती द्याव्यात या मध्ये वयाची अट शिथिलता तर द्यावीच परंतु ओबीसी आणि मराठा समाजातील निर्माण झालेली स्थिती कायम स्वरूपी मिटवण्या साठी "अराजकीय आरक्षण " हा शब्द आणि वरील प्रमाणे दुरुस्ती करणारा सुधारीत शासनादेश तात्काळ निर्गमित करावे ही सुद्धा अंत्यन्त महत्वाची त्यांची गेली एक दशका पासूनची त्यांची मागणी असुन याच सोबत त्यांनी सारथीला पाच हजार कोटींचा निधी तर स्व. आण्णासाहेब पाटील महामंडळास दहा हजार कोटी निधी,रखडलेल्या नियुक्त्या,आंदोलन काळा तील गुन्हे वापस घेणे आदी मागण्या त्यांनी सविस्तर पणे मांडल्या.त्यानुसार आता एसइबीसी न्यायालयीन प्रकारणासाठी हस्तक्षेप याचिकाकर्ता, विधिज्ञ व अधिकारी यांची बैठक २१ ऑक्टोबर रोजी मुंबईत होणार असुन मराठवाड्यातील आरक्षणा बाबत स्वतंत्र बैठक आयोजनाचे नियोजन होऊन इतर मागण्याची पूर्तता करण्यासाठी दर दोन महिन्यात एकदा मुंबईत बैठक घेण्याचे एक मताने ठरले आहे.या बैठकीस मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सदस्य मंत्री गिरिश भाऊ महाजन,मंत्री शंभूराजे देसाई,मंत्री नरेंद्र पाटील,आ.प्रसाद लाड,सारथीचे व स्व आण्णासाहेब पाटील महामंडळाचे कार्यकारी संचालक तसेच सारथीचे संचालक उमाकांत दांगट आदीनी मार्गदर्शन केले. या महत्वाच्या बैठकीस मराठा क्रांती मोर्चाचे राजेंद्र कोंढरे,रमेश केरे पाटील, सुभाष जावळे,राजन घाग, मराठा क्रांती मोर्चा टीम मुंबईचे रामचंद्र शेडगे,अनिल सुर्वे,बाळा साहेब इंगळे, राजन घाग, रुपेश मांजरेकर, सदाशिव बानुगडे,संतोष शेजवळ, प्रशांत भोसले,मारुती देसाई, स्नेहा गावंकर,राकेशवासुदेव, पांडुरंग रोडे,सुभाष देसाई, दिनेश पवार, शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे, सूर्याजी सोनूवले, सुभाष पाटील,अंतोष कांबळे,रवींद्र शिंदे, मनोज पवार,संतोष दळवी,किशोर चव्हाण, प्रा.शिवानंद भानुसे, प्रफुल्ल पवार,प्रा.रविंद्र बनसोड, विलास पांगरकर,करण गायकर,राजेंद्र चित्रे, परमेश्वर नलावडे,अंकुश कदम,रविंद्र काळे,सुनिल कोटकर,राहुल पाटील या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.